



दैनिक **युवावार्ता**
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25





वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ११३। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । १२/०५/२०२६ । पाने - ६




# प्रशासनाच्या निष्क्रियता, कचऱ्यामुळे नागरिक त्रस्त

## आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर; तातडीने स्वच्छता मोहिमेची मागणी

जाजु पेट्रोल पंपा समोर



म्हाळुंगी नंदी परिसर, साईनगर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शहर स्वच्छ आणि सुंदर करण्याच्या घोषणा केवळ कागदोपत्रीच राहिल्या असून प्रत्यक्षात मात्र संगमनेर शहरातील अनेक भाग कचऱ्याच्या विळख्यात सापडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. विशेषतः श्री स्वामी समर्थ मंदिर, रंगार गल्ली, साईनगर ते जाजु पेट्रोल पंप, अकोले नाका या मुख्य परिसरात मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचले असून नागरिकांना उग्र दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे संगमनेर नगरपालिकेच्या प्रशासनावर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

शहरातील मध्यवर्ती आणि वर्दळीच्या भागात अनेक दिवसांपासून कचरा उचलला जात नसल्याने परिसराची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्याच्या कडेला साचलेला ओला व सुका कचरा, प्लास्टिक पिशव्या, अन्नाचे अवशेष आणि दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कचऱ्यामुळे परिसरात भटके कुत्रे, मोकाट जनावरे देखील वाढले आहेत. या भागातून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, महिला आणि व्यापारी वर्ग ये-जा करत असताना प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ संगमनेर - सुंदर संगमनेर अशा घोषणा आणि मोहिमा राबवल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात शहरातील परिस्थिती पूर्णपणे वेगळी असल्याचे या परिसरातील चित्रावरून स्पष्ट होत आहे. स्वच्छतेच्या नावाखाली फक्त कागदी घोडे नाचवले जात असून जमिनीवर मात्र कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कचऱ्यामुळे मच्छर, माश्या आणि दुर्गंधी वाढली असून साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. आज केवळ घाण आहे, उद्या याच घाणीमुळे रोगराई पसरणार असेल तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, आमदार सत्यजितदादा तांबे, मुख्याधिकारी तसेच आमदार अमोल खताळ यांनी या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष घालून संबंधित परिसर कचरामुक्त करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

फोटोतील भीषण परिस्थिती प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करत असून शहराच्या स्वच्छतेबाबत प्रशासन किती गंभीर आहे, हेच या प्रकारातून समोर येत आहे. नागरिकांनी तातडीने कचरा उचलून नियमित स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी केली आहे.

# पंतप्रधानांकडून उपदेश नाही तर अपयशाची कबुली - राहुल गांधी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

राहुल गांधींनी सोमवारी पश्चिम आशियातील सध्याच्या संकटाचा सामना करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अलीकडील 'सात आवाहनांवर' पलटवार केला. त्यांनी याला अपयश म्हटले. ते म्हणाले की, आता देश चालवणे पंतप्रधानांच्या आवाक्याबाहेर गेले आहे.



द वरील एका पोस्टमध्ये राहुल गांधींनी लिहिले, 'काल मोदीजींनी जनतेकडून त्याग मागितला. सोने खरेदी करू नका, परदेशात जाऊ नका, पेट्रोलचा वापर कमी करा, खत आणि खाद्यतेलाचा वापर कमी करा, मेट्रोने प्रवास करा, घरून काम करा. हे उपदेश नाहीत. हे अपयश आहे.' ते म्हणाले, '१२ वर्षांत देशाला अशा टप्प्यावर आणले आहे की जनतेला सांगावे लागत आहे. काय खरेदी करावे, काय नाही. कुठे जावे, कुठे नाही.' खरेतर, रविवारी सिकंदराबाद येथील एका जाहीर सभेत पंतप्रधान मोदींनी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या गरजेवर भर दिला होता, जेणेकरून परकीय चलनाची बचत होईल.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना उद्देशून खालील सात आवाहन केले आहे.-**

१. पंतप्रधान मोदींनी रविवारी सांगितले होते की, 'आजच्या काळात पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर कमी करावा लागेल. शेजारील युद्धामुळे जगभरात पेट्रोल-डिझेलचे दर अनेक पटींनी वाढले आहेत. या जागतिक संकटाचा भारतावर अधिक परिणाम झाला आहे, कारण आपल्याकडे तेलाच्या मोठ्या विहिरी नाहीत. २. पेट्रोल, गॅस आणि डिझेल वाचवण्यासाठी आपल्याला वर्क फ्रॉम होमसारख्या उपायांची गरज आहे. ३. अनावश्यक वाहन वापर कमी करा. मेट्रोने प्रवास करा आणि कारपूलिंग करा. जास्तीत जास्त लोकांना त्यात बसवून घेऊन जा. ४. प्रत्येक कुटुंबाने खाद्यतेलाचा वापर थोडा कमी केल्यास परकीय चलनाची बचत होईल आणि लोकांचे आरोग्यही सुधारेल. ५. देशाने रासायनिक खतांचा वापर अर्धा करण्याचे लक्ष्य ठेवले पाहिजे आणि नैसर्गिक शेतीकडे वेगाने वाटचाल केली पाहिजे.६. लग्नसमारंभ, सुट्ट्या आणि इतर कारणांमुळे परदेश प्रवास काही काळासाठी पुढे ढकलणे देशहिताचे ठरेल. ७. सोन्याच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होते. देशहितासाठी लोकांनी एक वर्षापर्यंत सोने खरेदी करणे आणि दान करणे टाळावे.

# रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीवर किरण कडू पाटील यांची सर्वानुमते निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - रयत शिक्षण संस्थेतील उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील किरण अरुण कडू पाटील यांची रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे सात्रळसह संपूर्ण पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित बैठकीत संस्थेचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली जनरल बॉडी सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी किरण कडू पाटील यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संस्थाविकासासाठीच्या सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत त्यांची निवड जाहीर करण्यात आली.



किरण कडू पाटील यांनी आजोबा माजी आमदार कॉ. पी. बी. कडू पाटील तसेच वडील अरुण कडू यांच्या सामाजिक कार्याचा वारसा समर्थपणे पुढे नेत शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभे केले आहे. रयत शिक्षण संस्थेला विविध माध्यमांतून भरीव देणग्या उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी वाचन प्रकल्प राबविणे, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन मोहिमा प्रभावीपणे राबविणे आदी उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची गोडी लागावी, शालेय गुणवत्ता वाढावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. विद्यार्थ्यांना मानसिक ताणतणावातून मुक्तता मिळावी यासाठी क्रीडा विभागाच्या माध्यमातून गिर्यारोहणासारख्या उपक्रमांना चालना देण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. तसेच विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी विविध यशस्वी व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची व्याख्याने आयोजित करण्यावरही त्यांनी भर दिला आहे.

(पान ३ वर)

**विद्यार्थी घडविण्याचा वसा आणि समाजकारणाची अखंड परंपरा जपणाऱ्या कडू कुटुंबाच्या कार्याचा आणखी एक गौरवशाली अध्याय लिहिला गेला आहे. आशिया खंडातील सर्वात मोठ्या रयत शिक्षण संस्था या नामवंत शैक्षणिक संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी किरण कडू पाटील यांची निवड होणे, ही केवळ वैयक्तिक उपलब्धी नसून प्रवरा परिसराच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संस्कारमय परंपरेचा सन्मान आहे. रयत शिक्षण संस्थेच्या शाखा आर्थिक व प्रशासकीय अडचणीत असताना कडू कुटुंबाने स्वतःची मालमत्ता विकून संस्था वाचविण्यासाठी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी मानले जाते. हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या या त्याग, निष्ठा आणि शिक्षणसेवेच्या महान परंपरेचा भाग बनणे, ही अभिमानाची आणि गौरवाची बाब मानली जात आहे.**


# रखडलेल्या महामार्ग कामांचा फटका

## महामार्गावर वाहतूक कोंडी, अपघातांची मालिका

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या रखडलेल्या काँक्रिटीकरणाच्या कामामुळे शनिवारी (ता. ९) संगमनेर तालुक्यात वाहतुकीचा अक्षरशः खोळंबा झाला. माळवाडी ते आळेखिंडदरम्यान वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्याने प्रवाशांना तासन्तास महामार्गावर अडकून पडावे लागले. त्यातच विविध ठिकाणी घडलेल्या अपघातांच्या मालिकेमुळे संपूर्ण परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

एआय फोटो



बिबट मादीचा मृत्यू

गेल्या काही महिन्यांपासून बोटा ते आळेखिंडदरम्यान महामार्गाचे काँक्रिटीकरण आणि इतर विकासकामे सुरू आहेत. मात्र कामाचा वेग अत्यंत मंद असल्याने वाहतूक व्यवस्थेवर त्याचा मोठा परिणाम होत आहे. शनिवारी दिवसभर महामार्गावर प्रचंड वाहनांची गर्दी झाली होती. विशेषतः माळवाडी, माहुली घाट आणि आळेखिंड परिसरात वाहतूक वारंवार ठप्प होत असल्याचे चित्र दिसून आले.

सायंकाळी चंदनापुरी घाटाच्या पायथ्याशी दोन वाहनांमध्ये भीषण धडक होऊन सहाजण जखमी झाले. जखमींवर उपचार सुरू असून काहींची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. त्याचवेळी माहुली घाटात एक टेम्पो उलटल्याने आणखी एक व्यक्ती जखमी झाली. सलग झालेल्या या घटनांमुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. दरम्यान, रात्री आठ ते साडेआठच्या सुमारास कऱ्हे घाटातील मारुती मंदिरासमोर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका बिबट मादीचा मृत्यू झाला. माहिती मिळताच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या घटनेमुळे महामार्गावरील वन्यजीव सुरक्षेचाही प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

पुणे-नाशिक महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असताना सुरू असलेली विकासकामे, अपुरी वाहतूक नियंत्रण व्यवस्था आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव यामुळे प्रवास अधिक धोकादायक बनत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. वाहतूक कोंडी, वारंवार होणारे अपघात आणि रखडलेली कामे यामुळे वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, महामार्गावरील कामे तातडीने पूर्ण करून सुरक्षित व सुरळीत वाहतूक व्यवस्था उभी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.









# संत परंपरेचा अपमान महाराष्ट्र सहन करणार नाही : आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, संतपरंपरेचा आणि हिंदू अस्मितेचा आत्मा आहे. अशा पवित्र परंपरेवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करणाऱ्या प्रवृत्ती महाराष्ट्र कधीही सहन करणार नाही असा घणाघात आमदार अमोल खताळ यांनी केला आहे.

विकास लवांडे यांनी वारकरी संप्रदाय, संत परंपरा आणि हिंदू श्रद्धांबाबत केलेल्या कथित अपमानास्पद वक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त करताना ह.भ.प. संग्राम बापू भंडारे महाराज यांनी घेतलेल्या आक्रमक आणि ठाम भूमिकेचे आमदार खताळ पाटील यांनी जाहीर समर्थन केले आहे.

वारकरी संप्रदायाशी वाकड... त्याची नदीवर लाकड! ही भावना आज लाखो वारकऱ्यांच्या मनातील संताप व्यक्त करणारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. संतांची शिकवण, भगवी पताका आणि हिंदू धर्माची अस्मिता यांचा अपमान करणाऱ्यांना संविधानिक आणि लोकशाही मार्गाने ठोस उत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

ह.भ.प. संग्राम बापू भंडारे महाराज यांनी वारकरी संप्रदायाच्या सन्मानासाठी घेतलेली भूमिका ही केवळ एका व्यक्तीची प्रतिक्रिया नसून संपूर्ण वारकरी समाजाच्या भावना व्यक्त करणारी आहे. महाराष्ट्रातील संतपरंपरा, अध्यात्म आणि भक्तीची परंपरा अबाधित राखण्यासाठी समाज एकजुटीने उभा राहील, असा विश्वासही आमदार खताळ पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी ह.भ.प. संग्राम बापू भंडारे महाराजांचे मनापासून अभिनंदन करत जाहीर समर्थन व्यक्त केले.

# ग्रामसुरक्षा दलाच्या माध्यमातून गुन्हेगारीवर नियंत्रण : विखे पाटील

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी- मागील काही दिवसांपासून आश्वी परिसरात चोरांनी निर्माण केलेली दहशत, चोरीच्या घटनांची वाढती संख्या ड्रोनच्या माध्यमातून समाजिक वातावरण भयग्रस्त करण्याच्या प्रयत्नाना असलेल्या दहशतीला आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावे, पोलीस प्रशासनाला सर्वतोपरी सूचना देण्यात आल्या आहेत. सरकार ग्रामस्थांच्या बरोबर आहे. गावातील भीतीचे वातावरण दूर करा. युवकाचे ग्रामसुरक्षा दल आणि लोकसहभागातून संघटीत गुन्हेगारीचा बंदोबस्त करण्यात यश येईल असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

आश्वी बुद्रुक व आश्वी खुर्द येथे अलीकडे घडलेल्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर परिसरातील विविध गावामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांनी गावात येवून प्रमुख कार्यकर्ते ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधून दिलासा दिला.

बैठकीला संगमनेरचे पोलिस उपअधीक्षक कुणाल सोनवणे,



स्थानिक गुन्हे शाखेचे किरणकुमार कबाडी, मांची हिल उद्योग समूहाचे संस्थापक शालिग्राम होळकर, मच्छिंद्र पाटील थेटे, रामभाऊ पाटील भुसाळ, कैलास नाना तांबे, भगवानराव इलग, विजय म्हसे, सरुनाथ उंबरकर , बन्सी तांबे, भाऊ पाटील गायकवाड, मकरंद गुणे, बापूसाहेब गायकवाड, रोहिणीताई निघुते, अनिल भोसले, अनिल म्हसे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# राज्यात उष्माघाताच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यभरात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून, त्याचा गंभीर परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होताना दिसत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली असून आरोग्य विभागानेही याबाबत सतर्कतेचा इशारा दिला आहे. १ मार्च ते ९ मे या कालावधीत राज्यात उष्माघाताचे तब्बल २२९ रुग्ण आढळले असून, त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय आणखी तीन संशयित मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. यंदाच्या उन्हाळ्यात अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने ४० ते ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत असून नागरिकांना घराबाहेर पडताना त्रास सहन करावा लागत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यातील तापमान आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे.आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्वाधिक ७९ उष्माघाताचे रुग्ण आढळले आहेत. त्यानंतर नंदुरबारमध्ये २९, नाशिकमध्ये १९, अमरावतीत १२, बुलढाण्यात ११ आणि गडचिरोलीत ८ रुग्णांची नोंद झाली आहे. अकोला, अहिल्यानगर, वर्धा, यवतमाळ आणि रत्नागिरी या जिल्ह्यांमध्येही उष्णतेचा परिणाम जाणवत आहे.

दरम्यान, लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात राहणाऱ्या ६० वर्षीय शेतकऱ्याचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याची अधिकृत नोंद करण्यात आली आहे. तसेच जळगाव जिल्ह्यातील ३४ वर्षीय फळविक्रेत्याचाही तीव्र उष्णतेमुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. हे दोघेही दीर्घकाळ उन्हात काम करत असल्याची माहिती समोर आली आहे.

# शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा मोठा निर्णय !



युवावार्ता (प्रतिनिधी)

मुंबई - राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर सहकार विभागाने राज्यातील विविध बँकांकडून शेतकऱ्यांची सविस्तर माहिती संकलित केली आहे. विशेष म्हणजे, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या कर्जदारांना या योजनेचा लाभ मिळण्याची शक्यता असून, अंदाजे ३४ ते ३५ लाख शेतकरी या निर्णयामुळे लाभार्थी ठरणार असल्याची माहिती वरिष्ठ सूत्रांनी दिली आहे.

कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने बँकांकडून माहिती मागवली होती. यामध्ये बँकेच्या शाखेपासून आयएफएससी कोड, संस्था आयडी, सभासद क्रमांक, आधार क्रमांक, शेतकऱ्याचे नाव, मोबाईल क्रमांक, पत्ता, जिल्हा, तालुका, गाव, जमीन रेकॉर्ड, ग्राहक आयडी, खाते क्रमांक, मंजूर कर्ज रक्कम, कर्ज वितरणाची तारीख, परतफेडीची माहिती, मुद्दल व व्याजाची रक्कम, पीककर्जाची माहिती आदींचा समावेश आहे.

ही माहिती २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांतील नियमित तसेच थकबाकीदार कर्जदारांची घेण्यात आली आहे. बँकांनी संबंधित माहिती भरून ती सहकार विभागाकडे सादर केली असून, विभागाने पात्र लाभार्थ्यांची माहिती राज्य सरकारकडे सुपूर्द केली आहे.

दरम्यान सरकारकडून कर्जमाफीसाठीचे अंतिम निकष निश्चित करण्याचे काम सुरू आहे. मे अखेर होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना ३० जूनपूर्वी कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ दिला जाईल, अशी माहिती आहे. यासोबतच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही सरकारकडून प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय प्रस्तावित आहे. वेळेत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळण्याची शक्यता असून, त्यामुळे नियमित कर्जदारांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

# संगमनेरात दुकानाला आग

## नगरपालिकेच्या तत्परतेने अनर्थ टळला



छाया -प्रसाद शिरसाठ (सुतार)

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर: शहरातील खोजे गल्ली भागातील 'लेटेस्ट टेलर' या दुकानाला आज सकाळी अचानक आग लागल्याची घटना घडली. हे दुकान भंडारी मंगल कार्यालयाजवळ असून, कुमार बाप्ते यांच्या मालकीचे आहे. आगीची माहिती मिळताच संगमनेर नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने (फायर फायटर) तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जवानांच्या वेगवान कामगिरीमुळे आग वेळीच आटोक्यात आली, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला आणि परिसरातील इतर दुकानांना आगीची झळ बसण्यापासून वाचवता आले. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

# विकास लवांडे यांच्यावरील हल्ल्याचा बाळासाहेब थोरातांकडून निषेध

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -वारकरी संप्रदायाचा विचार हा सर्वांना समवेत घेऊन जाणारा मानवतेचा विचार आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी अशा कठीण काळात हा विचार पुढे नेण्यासाठी धीरोदत्तपणे सामोरे जाण्याची शिकवण दिली. विकास लवांडे यांच्यावरील झालेला भ्याड हल्ला हा अत्यंत दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया वारकरी विचारांचे पाईक तथा काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली.

संत परंपरेचा समतेचा विचार सांगणारे विकास लवांडे यांच्यावर तथाकथित संग्राम भंडारे यांनी आळंदी येथे शाईफेक हल्ला केला या घटनेचा तीव्र निषेध करून मा. मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, विकास लवांडे यांच्यावरील भ्याड हल्ला हा अत्यंत दुर्दैवी आहे. मात्र



या हल्ल्याला ते धीरोदत्तपणे सामोरे गेले आहे. संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले यांनी अशा कठीण काळात आपला विचार जोपासण्यासाठी धीरोदत्तपणे सामोरे जाण्याची शिकवण आपल्याला दिली आहे. हा विचार पुढे घेऊन जाताना पुरोगामी महाराष्ट्रात विचार मांडणाऱ्यांवर होणारे हल्ले हे चिंताजनक आहे. यापूर्वी प्रवीण गायकवाड, हनुमंत पवार यांच्यावरही असे हल्ले झाले. आणि आता विकास दादा लवांडे यांच्यावर ही हल्ला झाला आहे. हा हल्ला अत्यंत दुर्दैवी आहे. खरे तर प्रतिवाद करायला त्यांना संधी आहे. ते सांगू शकतात की आमचे वारकरी विचार असे आहेत. आणि त्यांनी ते सांगितले पाहिजे. मात्र तसे न करता हल्ला करून दहशत निर्माण करण्याचा हा त्यांचा प्रयत्न आहे.

दुर्दैवाने शासन त्यांना पाठीशी घालते आहे हे वाईट आहे. वारकरी संप्रदायातील सर्वांनी अत्यंत जागृतपणे या घटनेकडे अत्यंत जाणीवपूर्वक पाहिले पाहिजे. विचारातून प्रतिवाद करा. पण प्रतिवाद न करता, विचार न मांडता हल्ला करणे हे अत्यंत चुकीची पद्धत आहे . आणि अशा लोकांना शासन पाठीशी घालते हे दुर्दैवी असल्याची टीका मा. महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

# डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांना राष्ट्र सेवा दलाचा साने गुरुजी समता पुरस्कार जाहीर

युवावार्ता(प्रतिनिधी) -

सामाजिक सलोखा, समता आणि मानवतेच्या मूल्यांसाठी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा राष्ट्र सेवा दलाच्या वतीने दरवर्षी 'साने गुरुजी समता पुरस्कार' प्रदान करून गौरव करण्यात येतो. यंदाचा हा पुरस्कार दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा)चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांना जाहीर करण्यात आला आहे.

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून डॉ. भीमराव आंबेडकर देशभर सामाजिक सद्भावना समता आणि बंधुतेचे कार्य सातत्याने करत आहेत. समाजातील विविध घटकांमध्ये सलोखा निर्माण करून देश उभारणीच्या प्रक्रियेत त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून राष्ट्र सेवा दलाच्या वतीने



त्यांना 'साने गुरुजी समता पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.

हा पुरस्कार गुरुवार, दि. ४ जून २०२६ रोजी सायंकाळी साने गुरुजी स्मारक, पर्वती पायथा, पुणे येथे आयोजित राष्ट्र सेवा दलाच्या 'पुनर्गठन दिन' मेळाव्यात प्रदान करण्यात येणार आहे. समाजवादी नेते कपिल पाटील, राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, कार्यकारी विश्वस्त जयवंत पाटील आणि राज्यभरातून आलेल्या सेवा दल साथींच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान कार्यक्रम होईल. यापूर्वी हा पुरस्कार वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे यांना पंढरपूर येथे तसेच महानुभाव पंथाचे परम महंत श्री बाभुळगावकर बाबा (बा. भो. शास्त्री) यांना छत्रपती संभाजीनगर येथे प्रदान करण्यात आला आहे.

१ ते १० मे १९४७ या कालावधीत साने गुरुजींनी समतेचा ऐतिहासिक लढा उभारला होता. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांना प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी दहा दिवस उपोषण केले. अखेर १० मे रोजी मंदिराची दारे सर्वांसाठी खुली झाली.

साने गुरुजींच्या या समतावादी आणि मानवतावादी विचारांच्या स्मरणार्थ राष्ट्र सेवा दलाच्या वतीने 'साने गुरुजी समता पुरस्कार' प्रदान करण्यात येत असल्याचे राष्ट्र सेवा दलाचे महाराष्ट्राचे राज्य अध्यक्ष राजा कांदळकर यांनी सांगितले.

# लाडक्या बहिणींसाठी खुशखबर...

## बँक खात्यात आता एकदम तीन महिन्यांचे ४५०० रुपये?




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतून पडताळणी प्रक्रियेनंतर लाखो लाभार्थी महिला अपात्र ठरल्या असताना, पात्र महिलांसाठी आता दिलासादायक बातमी समोर येत आहे. ई-केवायसी प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या महिलांच्या बँक खात्यात रखडलेल्या तीन महिन्यांच्या अनुदानाचे एकत्रित ४५०० रुपये लवकरच जमा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शासनस्तरावर याबाबत हालचाली सुरू असून अधिकृत निर्णयाची प्रतीक्षा आहे.

महायुती सरकारने जून २०२४ मध्ये सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना दरमहा १५०० रुपयांचे थेट आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे हा होता. सुरुवातीला या योजनेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. सुमारे दोन कोटी ४७ लाख महिलांनी नोंदणी केली होती. मात्र, अर्जांची छाननी आणि विविध निकषांच्या पडताळणीनंतर लाभार्थ्यांची संख्या हळूहळू कमी होत गेली.

सध्या पात्र महिलांची संख्या १ कोटी ८९ लाखांवर स्थिरावल्याचे सांगितले जात आहे. शासनाने ई-केवायसी, उत्पन्न मर्यादा, सरकारी नोकरी आणि इतर निकषांच्या आधारे सखोल तपासणी सुरू केली. या प्रक्रियेदरम्यान अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या. काही महिलांनी चुकीची माहिती देऊन लाभ घेतल्याचे निदर्शनास आले, तर काही प्रकरणांमध्ये सरकारी सेवेत असतानाही स्वतःला अपात्र निकषांबाहेर दाखवून अनुदान मिळविल्याचे समोर आले.

दरम्यान, ई-केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण न झालेल्या महिलांकडून शासनाकडे पुन्हा मुदतवाढ देण्याची मागणी केली जात आहे. महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयांकडे अनेक लाभार्थी महिलांनी अर्ज सादर केले असून, राज्यातील विविध जिल्ह्यांतून अशाच स्वरूपाच्या मागण्या शासनाकडे पाठविण्यात आल्याची माहिती मिळत आहे. शासनाने यावर सकारात्मक निर्णय घेतल्यास आणखी अनेक महिलांना योजनेचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. योजनेतील पात्र महिलांना तीन महिन्यांचे रखडलेले हप्ते एकाच वेळी मिळाल्यास आर्थिक अडचणीत असलेल्या हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळू शकतो. त्यामुळे आता शासनाच्या पुढील निर्णयाकडे राज्यातील लाखो महिलांचे लक्ष लागले आहे.

# एलपीजी अनुदानावर सरकारची कडक कारवाई

## दहा लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांचे अनुदान बंद होण्याची शक्यता



एआय फोटो

मुंबई (वृत्तसंस्था)

इराण अमेरिका युद्धात एलपीजी गॅसची मोठी समस्या निर्माण झाली. बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये लॉकडाऊनही स्थिती आहे. होर्मुज खाडी बंद असल्याने कच्चे तेल आणि एलपीजीची वाहतूक ठप्प आहे. भारतात एलपीजी गॅसचा तुटवडा आहे. त्यामध्येच आता काही नियमात बदल करण्यात आला. ज्यांचे वार्षिक उत्पन्न दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक आहे, अशा ग्राहकांना एलपीजी सिलिंडरवर अनुदान मिळणार नाही. याचा अर्थ असा आहे की, घरगुती सिलेंडर अधिक पैसे देऊन खरेदी करावे लागणार आहे. तेल कंपन्यांनी देशभरातील दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक उत्पन्न असलेल्या ग्राहकांची माहिती संकलित केली आहे. याबाबत त्यांना मेसेजही पाठवला जाईल. एलपीजी गॅस सिलेंडरच्या तुटवड्यादरम्यान तेल कंपन्यांकडून मोठे निर्णय घेतले जात आहेत. यासोबतच अजून एक मोठा दणका देण्यात आला. याव्यतिरिक्त, मृत आणि बनावट खातेधारकांना ओळखले जात आहे. त्यांची चौकशी करून त्यांचे कनेक्शन्स कायमस्वरूपी बंद केली जात आहेत. तेल विपणन कंपन्यांनी एलपीजी अनुदानात पारदर्शकता आणण्यासाठी ही मोहिम सुरू केली. उच्च उत्पन्न गट आणि मृत ग्राहकांच्या एलपीजी गॅस जोडण्यांची चौकशी सुरू केली आहे. यामुळे फक्त पात्र आणि या नियमात बसणाऱ्या ग्राहकांनाच अनुदान मिळणार आहे. सरकारी नियमांनुसार, ज्या ग्राहकांचे वार्षिक एकूण करपात्र उत्पन्न १० लाखांपेक्षा जास्त आहे, ते उच्च उत्पन्न गटात येतात, त्यांना गॅससाठी अनुदान मिळू शकणार नाही. आता या ग्राहकांचा शोध घेतला जात आहे. तेल विपणन कंपन्या आयकर विभागाच्या डेटाबेसद्वारे ग्राहकांच्या तपशिलाची पडताळणी करत आहेत. तशी मोहिमच त्यांनी हाती घेतली. यापूर्वी अनेक ग्राहक १० लाखांपेक्षाही अधिक उत्पन्न असतानाही सवलतीचा फायदा घेत. मात्र आता याला आळा बसणार आहे. अशा ग्राहकांचा शोध हा सुरू आहे. देशात एलपीजी गॅसची मोठी समस्या असतानाच दुसरीकडे तेल कंपन्यांकडून मोठी पाऊले उचलली जात आहेत. कंपन्या ग्राहकांना ऑनलाइन लिंक पाठवून याची मागणी करत आहेत. मृत कनेक्शन धारकांच्या कुटुंबीयांना कनेक्शन एकतर त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावर हस्तांतरित करण्याचा किंवा ते बंद करण्याचा पर्याय दिला जात आहे.












# राष्ट्रीय लोकअदालतीत ३५ हजार ९३२ प्रकरणे निकाली; सुमारे ५० कोटी रुपयांची तडजोड



अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार, दि. ९ मे २०२६ रोजी जिल्हा न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीत मोठ्या प्रमाणावर प्रकरणांचा निपटारा होऊन सुमारे ५० कोटी रुपयांची तडजोड करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. योगेश पैठणकर यांनी दिली.

राष्ट्रीय लोकअदालतीत जिल्ह्यातील विविध न्यायालयांमधील दिवाणी व फौजदारी प्रकरणे, धनादेश व चेक अनादर प्रकरणे, बँक कर्जवसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई दावे, कामगार न्यायालयातील प्रकरणे, कौटुंबिक वाद, वीज महावितरणाशी संबंधित समझोता योग्य प्रकरणे, तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची दाखलपूर्व प्रकरणे आपसी समझोत्यासाठी ठेवण्यात आली होती.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जिल्ह्यातील एकूण ३३ हजार ८१६ दाखलपूर्व प्रकरणे मिटविण्यात आली, तर २ हजार ११६ प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. तसेच विशेष मोहिमेंतर्गत ८७८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. अशा प्रकारे एकूण ३५ हजार ९३२ प्रकरणे यशस्वीरित्या निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, सर्व वकील संघटना, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा पोलीस प्रशासन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी व विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनीही विशेष योगदान दिले.

# चंद्रभागा शेळके यांचे वृद्धापकाळाने निधन



अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले पंचायत समितीचे माजी सदस्य अरुण भालचंद्र शेळके यांच्या मातोश्री चंद्रभागा भालचंद्र शेळके यांचे शनिवार, दिनांक ०९/०५/२०२६ रोजी सकाळी वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्यावर शनिवारी सायंकाळी देवठाण येथील आढळा तीरावर शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात सुनील भालचंद्र शेळके, अरुण भालचंद्र शेळके, विजय भालचंद्र शेळके ही मुले तसेच दिर, भाऊ, सुना, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. चंद्रभागा शेळके यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

कै. चंद्रभागा शेळके या शांत, मनमिळावू आणि धार्मिक वृत्तीच्या व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात परिचित होत्या. समाजातील प्रत्येक व्यक्तीशी आपुलकीने वागण्याची त्यांची शैली असल्याने त्यांच्या निधनाने देवठाण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अनेकांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

शेळके परिवार सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असून, या परिवाराने विविध सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमीच सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे कै. चंद्रभागा शेळके यांच्या निधनाची बातमी समजताच अनेक मान्यवर, नातेवाईक व ग्रामस्थांनी श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले.

# विश्व देव सत्यत्वे । देव तया जवळी असे ॥ संत तुकाराम महाराज

## समाजातील विकृतींवर कोरेगावकर महाराजांचा विनोदी शैलीत प्रहार

**ऐसा ज्याचा अनुभव ।**
**विश्व देव सत्यत्वे ।। १।।**
**देवा तया जवळी असे ।**
**पाप नासे दर्शने दर्शने ।।२।।**
**कामक्रोधा नाही चाली ।**
**भूती झाली समता ।।३।।**
**तुका म्हणे भेदाभेद ।**
**गेला वाद खंडोनी ।।४।।**

युवावार्ता (सदाशिव मुळे) - संगमनेर शहराच्या जनता नगरमध्ये सुरू असलेल्या ह. भ. प. बाळकृष्ण महाराज कर्पे यांचे नेतृत्व व प्रेरणेने ३८ वा अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सव सोहळ्यात कीर्तन रुपी तिसरे पुष्प गुंफतांना कोरेगाव येथील ह. भ. प. दयानंद महाराज कोरेगावकर यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा खरीभक्ती आणि ब्रह्मज्ञानाची अवस्था कशी असते याचे महत्त्व विशद करणारा अभंग सेवेसाठी घेतला. या अभंगाचा मतितार्थ असा की, या जगात सर्वत्र देवच आहे असा ज्याचा दृढ निश्चय असतो, देव त्याच्या जवळच राहतो व त्याच्या दर्शनाने पाप नाहीसे होते. त्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा काम क्रोध वास्तव्य करीत नाही. व त्याच्या अंतकरणात सर्वत्र देवच आहे. सर्व भूतमात्रांविषयी समान भावना प्राप्त झालेली असते. संत तुकाराम महाराज म्हणतात अशा या ब्रह्मरूप झालेल्या माणसांच्या मनामधून भेदाभेद व वादविवाद खंडित झालेले असतात. हरिभक्त परायण दयानंद महाराज कोरेगावकर यांनी आपल्या कीर्तनातून आजच्या सामाजिक पत्रकारिता राजकारण वारकरी संप्रदाय व इतर क्षेत्रात निर्माण झालेल्या विकृतीवर आपल्या विनोदी शैलीतून आसूडले ओढले. महाराष्ट्रात समाजात व राजकारणात विकृती निर्माण झाल्यामुळे राज्याचे वाटोळे झाल्याचे अनेक उदाहरणावरून विशद केले. विनोदातून विकृतीवर शाल जोडीतून फटके मारले. परमार्थाबाबत बोलताना ते म्हणाले परमार्थातील सुख सोहळा स्वर्गातही नाही परंतु हा आनंद उपभोगण्यासाठी भक्तीच करावी लागते वारकऱ्यांचे जीवन मुक्त आहे वारकरी कळण्यासाठी वारकरीच व्हावे लागते. अभंगावर निरूपण करताना ते म्हणाले की, सगळ्या विश्वात देव एकच आहे. याचा अनुभव घ्यावा लागतो. असा अनुभव आला की,




देवाला इतरत्र शोधायची गरज पडत नाही. याबाबत त्यांनी अनाथांची माय सिंधुताई सपकाळ व बाबा आमटे यांच्यासारख्या अनेक समाजसेवा करण्याचे उदाहरण दिली. अनेक समाजसेवकानी माणसांमध्ये देव पाहिला त्यानी रांजल्या गांजल्याची सेवा केली. त्यांनी



माणसांमध्ये देव पाहिला. देवाची ओळख झाली की काम, क्रोध, लोभ मोह यांचा शिरकाव होत नाही. भेदच नष्ट होतो सर्व प्राणीमात्रात देवच दिसतो. सर्वांबद्दल त्यांची प्रेमभावना बाळवते त्याला ब्रह्मरूप अवस्था प्राप्त होते सर्व भेदाभेद वादविवाद कायमचे संपुष्टात येतात. त्यांच्या ठिकाणी समाधान, शांतता व परमानंद उरतो. देव बाहेर नाही अंतरंगात आहे व तो अनुभवायचा विषय आहे.जेव्हा आपल्याला चरा चरात देव दिसेल त्यावेळेस समदृष्टी येते. सर्व वाद सपंतात. खरी भक्ती म्हणजे सर्वाभोवती एकच देव पाहणे आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराज हे आपल्या अभंगात म्हणतात -विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म ।। या उक्तीप्रमाणे आपण वागले पाहिजे. म्हणजे सत,चित आनंद प्राप्त होईल.

**ड्रायव्हर पाहिजे**

**ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा**

**मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा**

**निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे**

**8668269897**

# रयत शिक्षण संस्थेच्या जनरल...

पान नं. ०१ वरुन-


रयत शिक्षण संस्थेच्या विविध प्रकल्पांमध्ये आणि उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग नेहमीच अग्रस्थानी राहिला असून त्यांच्या सर्वांगीण कार्याची दखल घेत संस्थेचे अध्यक्ष शरद पवार व समितीने त्यांची निवड केल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष शरद पवार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दिलीप वळसे, खासदार सुप्रिया सुळे, चेअरमन चंद्रकांत दळवी, अनिल पाटील, भगीरथ शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, बाबासाहेब नाईकवाडी, विभागीय गुणवत्ता कक्ष प्रमुख काकासाहेब वाळुंजकर, प्राचार्य सिताराम गारुडकर, पर्यवेक्षिका हेमलता साबळे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख विलास दिघे, शाळा समिती पदाधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी, पालक, विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

विशेष म्हणजे, आशिया खंडातील सर्वात मोठ्या रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी निवड होणे हा प्रवरा परिसरासाठी अभिमानाचा क्षण मानला जात आहे. प्रवरा परिसरातील रयत शिक्षण संस्थेच्या शाखा अडचणीत असताना कडू कुटुंबीयांनी स्वतःची मालमत्ता विकून संस्था वाचविल्या आणि हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविले. विद्यार्थी घडविणाऱ्या या महान परंपरेचा भाग बनण्याची संधी मिळाल्याने परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.

# संत मुक्ताबाईंच्या विचारांतून मनशुद्धीचा संदेश

संत मुक्ताबाई या वारकरी संप्रदायातील थोर संत कवयित्री आणि संत ज्ञानदेवांच्या धाकट्या बहिणी होत्या. अवघ्या वीस वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. परंतु, असे म्हणतात ना, किती जगला यापेक्षा कसा जगला हे महत्त्वाचे आहे. मुक्ताबाईंचे ताटीचे अभंग, चांगदेव पासष्टी प्रसिद्ध आहे. त्यांनी विषमतेवर प्रहार केला. अध्यात्मिक ज्ञान दिले. मुक्ताईनगर या ठिकाणी त्यांची समाधी आहे. मुक्ताबाईंनी माय मराठीच्या सारस्वतात भक्तीचा मळा फुलवला आणि मराठी साहित्याचे दालन सर्वांसाठी खुले केले. त्या मुक्ताबाईंची आज पुण्यतिथी आहे. मराठी साहित्यातील पहिली कवयित्री म्हणूनही त्यांना ओळखले जाते.



विरक्ती, ज्ञान, भक्ती, मुक्ती यांचे स्वरूप म्हणजे निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई हे जन्माला आले. संन्याशाची पोरं म्हणून समाजाने त्यांना वाळीत टाकले. सर्व भोग त्यांनी सोसले. मुक्ताबाई ही भावंडांची माऊली झाली. मुक्ताबाईंच्या हातून मोठे कार्य झाले. योगी चांगदेव मोठे तपस्वी होते. परंतु, त्यांनी गुरू केला नव्हता. त्यामुळे ईश्वर दर्शन त्यांना झाले नाही. मुक्ताबाईने चांगदेव पासष्टीचा अर्थ त्यांना उलगडून दाखवला. त्यामुळे चांगदेवांनी मुक्ताबाईला अध्यात्मिक गुरु केले.

मुक्ताबाईच्या जीवनातील एक मोठा प्रसंग म्हणजे मांडे भाजण्यासाठी मुक्ताबाईंना कोणीही खापर देईना. मातीचे खापर घेण्यासाठी त्या कुंभार वाड्यात गेल्या. परंतु, गावचा प्रमुख विसोबा चाटी हा तिथे होता. त्याने खापर दिले नाही. त्यामुळे मुक्ताबाई अत्यंत खिन्न मनाने परत आल्या. ज्ञानदेवांनी ओळखले. ज्ञानदेवांनी आपल्या योग सामर्थ्याने आपल्या पाठीवर मुक्ताबाईला मांडे भाजण्यास सांगितले. हे जेव्हा विसोबाला कळाले, तेव्हा तो ज्ञानदेवांना शरण आला आणि धावत धावत जाऊन पाठीवर भाजलेल्या मांड्यावर त्याने धडक घातली. त्यावर मुक्ताईने त्यांना खेचर पक्षी असे म्हटले. तेव्हापासून विसोबांनी तेच नाव धारण केले आणि ते विसोबा खेचर बनले.

मुक्ताबाईंनी ताटीचे जवळजवळ ४२ अभंग लिहिले. ज्ञानदेवांनी आत्मक्लेषामुळे दरवाजा बंद करून घेतला होता. मुक्ताईने ताटी उघडावी म्हणून विनवणी केली आणि ज्ञानदेवांना सांगितले, आदिनाथांपासून गहिनीनाथांनी आणि निवृत्ती ज्ञानदेवांकडे आलेल्या नाथ संप्रदायाची आठवण करून दिली. योगी पावन मनाचा! साहे अपराध जनांचा! विश्व रागे झाले वन्ही! संती सुखी व्हावे पाणी! शब्द शस्त्र झाले क्लेश! संती मानावा उपदेश! विश्व पट ब्रह्म दोरा! ताटी उघडा ज्ञानेश्वरा!!

मुक्ताई पुढे म्हणतात, हात आपुला आपणा लागे! त्याचा करू नये खेद! जीव दातांनी चाविली! कोणी बत्तीशी पाडिली! चणे खावे लोखंडाचे! मग ब्रह्मपदी नाचे!! शेवटी मुक्ताबाई हळव्या झाल्या आणि म्हणाल्या, लडिवाळ मुक्ताबाई! जीव मुद्‌दल ठायीचे ठायी! तुम्ही तरुण विश्व तारा! ताटी उघडा ज्ञानेश्वरा!! संत मुक्ताबाईंनी ज्ञानदेवांच्या भेटीस झालेल्या संत नामदेवांचे अज्ञान कुठे केले. त्यावेळी संत मुक्ताबाईच्या प्रतिभेने ते चकीत झाले. संत नामदेव म्हणाले, लहानशी मुक्ताबाई जैसी सणकांडी! केले देशोधडी महान संत!!

चांगदेवांना उपदेश केला. चांगदेव पासष्टी म्हणजेच अध्यात्मिक प्रगल्भता, अहंकाराचा विलय आणि आत्मज्ञानाचा उपदेश. चांगदेवांना आपल्या तपश्चर्येचा, ज्ञानाचा अहंकार झालेला होता. तेव्हा मुक्ताबाईंनी त्यांना चांगदेव पासष्टीच्या माध्यमातून ज्ञानाचा मार्ग दाखवला.

चांगदेवांच्या कोऱ्या पत्राचे उदाहरण खूप छान आहे. चांगदेव हे योगी होते. त्यांनी चौदाशे वर्षे तप केले. त्यांनी ज्ञानदेवांना कोरे पत्र पाठवले. त्याच्यावर आपली स्वाक्षरी सुद्धा केली नाही. ते योगी होते. त्यांनी अर्थपूर्ण कोरे पत्र पाठवले. कोरेपणा म्हणजे स्वच्छपणा, अहंकार रहित सात्विकपणा. कोरा असेल तरच त्यावर काहीतरी लिहिता येईल. म्हणून चांगदेवांनी कोरे पत्र पाठवले आणि आपली योग्यता सिद्ध केली.

माझ्या मनातील सर्व विकार मी पुसून टाकले आहेत. मी नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी योग्य आहे, कारण मी माझी स्वाक्षरी सुद्धा केलेली नाही. कारण आता मीच उरलो नाही. हे कोरे पत्र ज्ञानदेवांना वाचता आले व त्या पत्रातील भावना ज्ञानदेवांनी ओळखल्या. त्यामुळे त्या पत्रावर ज्ञानाची अक्षरे उमटू लागली. लेखक श. गो. तुळपुळे म्हणतात, मुक्ताबाईच्या काव्यात तिच्या जीवनाचे व प्रतिभेचे अनेक पैलू आपल्याला दिसतात. तिच्या अभंगांमध्ये योगाच्या खुणा आहेत. अध्यात्माची उंची आहे. साक्षात्काराचे पडसाद आहेत आणि हृदयाचे मार्दव व भावना आहेत.

संत मुरक्ताबाईंनी आपल्या उपदेशामध्ये सांगितले की, अहंकार विरहित भक्ती करावी. सद्गुरूंना शरण जावे. चांगदेवांना कोरा ते कोराच असे म्हणताना त्यांनी अनुभवाची व गुरुपरंपरेची जाणीव करून दिली. विटाळ मुक्त जीवन हवे. मुक्ताबाई म्हणतात, देहासी विटाळ म्हणती सकळ! आत्मा तो निर्मळ नित्य शुद्ध!! शरीराला विटाळ असेल, परंतु आत्मा हा निर्मळ आणि नित्य शुद्ध असतो. तो नेहमी निर्मळ असतो. त्यांनी मनाच्या शुद्धतेवर भर दिला. क्षमाशील रहा, अपराध पोटात घाला, अहंकार बाळगू नका. आत्मज्ञानी व्हा आणि सर्वात महत्त्वाचे मनाची शुद्धता राखा. संत मुक्ताबाईंच्या पुण्यतिथीनिमित्त हा शब्दप्रपंच.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो.नं.९८९०१६३६४२**

# बितन गडावर महाराणा प्रताप यांची ४८६ वी जयंती साजरी



राजूर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

वीर शिरोमणी महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज, इतरही पराक्रमी राजांचा जन्म गडकिल्ल्यांवरच झालेला आहे. त्यामुळे गडकिल्ल्यांचे महत्त्व व इतिहास जपण्याच्या उद्देशाने घोटी शहरातील कळसूबाई मित्र मंडळाचे गिर्यारोहक अविरत गेल्या तीन दशकांपासून महाराष्ट्रातील विविध गडकिल्ल्यांवर धार्मिक, ऐतिहासिक उपक्रम राबवित असतात.

अदम्य, अपराजित, आजीवन स्वतंत्र, त्याग, तपस्या, बलिदान आणि स्वाभिमानाचे प्रतीक, मेवाड रत्न, माँ भारतीचे महान सुपुत्र महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० मध्ये राजस्थानातील कुंभलगडावर झाला होता. कळसूबाई मित्र मंडळाने अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्याच्या सरहद्दीवर, तसेच कळसूबाई शिखर व विश्रामगड यांच्या मध्ये असलेल्या बितन गडावर भारताच्या इतिहासात त्याग, बलिदान व महापराक्रमाचे प्रतीक असलेले, स्वाभिमानी, सनातन धर्म रक्षक, योद्धा वीर शिरोमणी महाराणा प्रताप व हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून राणा की जय हो, शिवा की जय हो गर्जना देत महापुरुषांना अभिवादन केले.

तसेच स्वराज्य वाचविण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांना मदत करणारे दुर्गादास राठोड यांचे स्मरण करून त्यांना देखील अभिवादन करण्यात आले. गड किल्ल्यांचा इतिहास, स्थापत्य, प्रशासन, युद्धनीती, तसेच महापराक्रमी राजांच्या शौर्याच्या इतिहासाची जनजागृती करीत महाराणा प्रताप यांची ४८६ वी जयंती बितन गडावर अतिउत्साहात साजरी केली.

या कार्यक्रमात कळसूबाई मित्र मंडळाचे अध्यक्ष भगीरथ मराडे, अभिजीत कुलकर्णी, डॉ. महेंद्र आडोळे, निलेश पवार, प्रवीण भटाटे, संजय शर्मा, गोकुळ चव्हाण, सुधाकर तांबे, संजय शेवाळे, चेतन जोशी, नामदेव जोशी, नारायण नाठे, गोकुळ सूर्यवंशी, नगमा खलीफा, रेखा भटाटे, मृणाली सातपुते, गायत्री मराडे सहभागी झाले होते।

# संपादकीय...

## बारावी-दहावी निकालात मुलींचाच दबदबा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावी व बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आणि नेहमीप्रमाणे यंदाही मुलींनी आपल्या यशाची परंपरा कायम राखत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. राज्याचा बारावीचा निकाल यावर्षी काहीसा घसरला असला, तरी विद्यार्थ्यांच्या यशामध्ये मुलींचे प्रमाण लक्षणीयरीत्या अधिक राहिले आहे. ही बाब केवळ शैक्षणिक यशाची नसून सामाजिक परिवर्तनाची नांदी मानली जात आहे. पूर्वी शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुली आज प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहेत. आज मुली केवळ परीक्षांमध्ये उत्तीर्ण होत नाहीत, तर गुणवत्तेच्या शर्यतीत मुलांपेक्षाही आघाडी घेत आहेत. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी पेटविलेल्या शिक्षणाच्या ज्योतीचे हे तेजस्वी रूप असल्याची भावना समाजात व्यक्त होत आहे. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून दहावी आणि बारावीच्या निकालांमध्ये मुलींचे वर्चस्व सातत्याने दिसून येत आहे. यंदाही मुलींनी मोठ्या आत्मविश्वासाने आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर यश मिळवले. मुलींची संख्या तुलनेने कमी असतानाही त्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण अधिक असणे ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. हे चित्र केवळ शहरांपुरते मर्यादित नसून ग्रामीण भागातील मुली देखील आता शिक्षणात मोठी झेप घेताना दिसत आहेत. पालकांची बदलती मानसिकता, मुलींना मिळणारे प्रोत्साहन, शासनाच्या विविध योजना, तसेच शिक्षणाविषयी निर्माण झालेली जागरूकता यामुळे मुलींच्या शिक्षणाला नवी दिशा मिळाली आहे. एकेकाळी चूल आणि मूल इतक्याच चौकटीत बंदिस्त राहणाऱ्या मुली आज डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी, वैज्ञानिक आणि उद्योजक होण्याची स्वप्ने पाहत आहेत आणि ती पूर्णही करत आहेत. हे बदलते चित्र समाजासाठी आशादायी आहे. यावर्षी निकालाची टक्केवारी काहीशी कमी झाली असली, तरी त्यामुळे शिक्षणव्यवस्थेची खरी गुणवत्ता समोर आली आहे. राज्य सरकारने राबविलेल्या कॉपीमुक्त परीक्षा अभियानामुळे निकालात वास्तवता दिसून आली. यापूर्वी अनेकदा शेकडो विद्यार्थी पैकीच्या पैकी गुण मिळवत असल्याचे चित्र होते. मात्र आता परीक्षांमध्ये प्रामाणिकपणा वाढत असून विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय पर्याय राहिलेला नाही. तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे भविष्यात शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढणार आहे. उत्तरपत्रिका तपासण्यापासून ते विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे विश्लेषण करण्यापर्यंत अनेक ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरली जाऊ शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ गुणांसाठी नव्हे, तर ज्ञानासाठी शिक्षण घेणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. या बदलत्या काळात मेहनत, सातत्य आणि प्रामाणिक अभ्यास यांनाच महत्त्व प्राप्त होणार आहे. मुलींनी यश मिळविताना याच गुणांचा आधार घेतला आहे. अनेक अडचणी, सामाजिक बंधने आणि आर्थिक संकटांचा सामना करत त्यांनी मिळवलेले यश हे इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनी मर्यादित साधनसामग्रीतून अभ्यास करून उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. त्यामुळे हे यश केवळ गुणांचे नसून जिद्दीचे, चिकाटीचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. शिक्षणामुळे मुलींमध्ये आत्मनिर्भरता निर्माण होत आहे. शिक्षित मुलगी केवळ स्वतःचे आयुष्य घडवत नाही, तर संपूर्ण कुटुंब आणि समाजालाही सक्षम बनवत असते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे केवळ निकालाच्या चौकटीत पाहण्यापेक्षा समाज परिवर्तनाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. आज सावित्रीच्या लेकी प्रत्येक क्षेत्रात झेप घेत आहेत आणि महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावत आहेत. हे यश केवळ विद्यार्थिनींचे नसून पालक, शिक्षक आणि समाजाच्या सकारात्मक विचारांचेही फलित आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षेत यश मिळवणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना, अपयश आलेल्या विद्यार्थ्यांनीही खचून न जाता नव्या उमेदीनं पुढे वाटचाल करावी, हीच अपेक्षा. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ गुण मिळवणे नसून चांगला माणूस घडवणे हा आहे आणि त्या दिशेने आजची तरुण पिढी निश्चितच वाटचाल करताना दिसत आहे.


Happy Birthday



मा. श्री. मनोज आगे

राज्य समन्वयक, संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र, मुंबई



मा.श्री. चेतन नाईकवाडी

युवानेते

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता


# विठे माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे दहावीत उल्लेखनीय यश



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील ह.भ.प. सावित्रीआई माध्यमिक विद्यालय, विठे येथील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील कु. वैष्णवी हरीदास आरोटे हिने ८१.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर साहिल मदन भागवत याने ७८ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. मयुर लक्ष्मण उघडे याने ७३.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

याशिवाय, सोहम योगेश आरोटे याने ७२.४० टक्के गुण मिळवत चौथा क्रमांक मिळविला असून, अदिती किसन आरोटे हिने ७०.६० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच, अकोले कन्या विद्यालयातील सेमी इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी कु. छत्रपती विश्वासराव आरोटे याने ७४.६० टक्के गुण प्राप्त केले. अगस्ती विद्यालयातील विद्यार्थी कु. आर्यन नवनाथ आरोटे याने ४५ टक्के गुण मिळवत यश संपादन केले.

इयत्ता दहावी व बारावीमध्ये यश मिळविणाऱ्या गावातील सर्व गुणवंत, ज्ञानवंत व बुद्धिवंत विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालक, शिक्षक व विद्यालयाचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, शेतकरी व व्यावसायिक संध्या हरीदास आरोटे यांच्या कुटुंबाचेही सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# दहावी परीक्षेत प्रवरा विद्यालयाची भरारी



शिबलापूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील प्रवरा माध्यमिक विद्यालयाने दहावी बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये गुणवंत व यशवंत विद्यार्थी वाणी अमर अंकुश याने ८४% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. द्वितीय क्रमांक वाणी गौरव कानिफनाथ याने ८३.४०% गुण मिळविले आहेत, तर तृतीय क्रमांक हारदे सोनम दादासाहेब हिने ८१% गुण मिळविले आहेत. परीक्षेत बसलेले - ३१, डिस्टिंक्शन - ०४, फर्स्ट क्लास - १३, सेकंड क्लास - ०९, पास क्लास - ०३, एकूण पास - २९, नापास - ०२.

सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांना मार्गदर्शन करणारे मुख्याध्यापक प्रभाकर सांगळे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्वांचे विद्यालयातर्फे व ग्रामस्थांतर्फे, पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य डॉ. नामदार राधाकृष्ण विखे पाटील, भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष शालिनी विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रभाकर सांगळे, मधुकर वाणी, सुनील वाणी, गोरख वाणी, प्राध्यापक बाबासाहेब वाणी, डॉक्टर रमेश वाणी, मधुकर नाईकवाडी, सोमनाथ डोळे, तसेच जनसेवा युवा मंच झरेकाठी, भाजपा बुथ प्रमुख झरेकाठी सोमनाथ डोळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# जोर्वे येथील विद्यालयाचे दहावी परीक्षेत यश



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या जोर्वे येथील समता विद्या मंदिर व शिल्पवेता मधुकरराव संतुजी थोरात कनिष्ठ महाविद्यालयाच्या दहावी परीक्षेचा ९४.३६% निकाल लागला.

विद्यालयात प्रथम घुले सुयश, दिघे कल्याणी, द्वितीय काकड शिवराज, तर तृतीय दिघे वेदिका यांनी क्रमांक पटकाविला. विशेष प्राविण्यात १३, तर प्रथम श्रेणीमध्ये २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व जोर्वे ग्रामस्थांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्या भरीतकर, वर्गशिक्षक श्री. भांगरे आदिराज व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, जि. अहिल्यानगर ता. संगमनेर पैकी मौजे गुंजाळवाडी येथील शेतजमीन

| स. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु = पैसे) |
|---|---|---|
| ८/१ | ०= १९ | ३ = ५५ |
| ८/२ | १= ०५ | ४= १५ |
| १०/२ | ०= ५८ ख. ०= ०.२ | २ = ३० |

| स. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु = पैसे) |
|---|---|---|
| १०/३ | १ = १४ ख. ०= ०.५ | ४ = ७० |
| १०/८ | ०= ७३ | ३ = १५ |

यांसी चतुः सिमा गावचे रेकॉर्डप्रमाणे सदर मिळकत मुळची विनायक बेलापूरकर यांची होती. त्यांचे मृत्यूनंतर ती मिळकत त्यांची मुले प्रभाकर, केशव उर्फ भास्कर, माधव, विश्वनाथ ही मुले व उषा शरदचंद्र देशमुख मुलगी यांचे नावावर वारसाहक्काने आली. त्यात प्रत्येकाचा १/५ हिस्सा. सदर मिळकतीतील प्रभाकर विनायक बेलापूरकर यांचे १/५ हिश्यातील ३/४ हिस्सा सुभाष प्रभाकर बेलापूरकर याचा आहे. तो अविभक्त हिस्सा सुभाष प्रभाकर बेलापूरकर यांनी आमचे अशील बाळासाहेब रेवजी गुंजाळ, दिपक श्रीनिवास जाजू व प्रविण तान्हाजी वर्पे यांना खरेदी देण्याचे ठरवून तारीख १२/०८/२०२४ रोजी दस्त नंबर ५१४१/२०२४ रोजी नोंदवून इसार पावती करून दिली आहे. वरील मिळकतीचे वाटप झाल्यानंतर व मिळकतीला सुभाष प्रभाकर बेलापूरकर यांचे नावाची वाटपाची नोंद झाल्यानंतर १ महिन्याचे आत खरेदीखत करून देणेचे ठरले आहे. परंतु वरील मिळकतीचे अद्यापपावेतो वाटपपत्र झालेले नाही, म्हणून सदर मिळकतीचे खरेदीखत नोंदविणेचे राहिले आहे. यांत सुभाष प्रभाकर बेलापूरकर यांनी मिळकतीचा सामाईक ताबा आमचे अशिलांस दिलेला आहे. खरेदीकामी पुर्तता केलेनंतर उर्वरित रक्कम देऊन सदर मिळकतीचे खरेदीखत करून घेणेस आमचे अशील तयार होते व आहेत. तरी वरील मिळकतीचे संबंधाने सुभाष प्रभाकर बेलापूरकर यांनी त्यांचा अविभक्त हिस्सा आमचे अशिलास खरेदी देणेचे ठरवून दस्त नंबर ५१४१/२०२४ अन्वये साठेखत लिहून दिले असलेने सदर मिळकतीचे संबंधाने त्यांचेशी कोणीही व्यवहार करू नये, याउपर कोणी वरील मिळकतीचा व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. ही नोटीस ता. ०९/०५/२०२६.

**ॲड. सुनिल गणपतराव गेठे**

**'लक्ष्मी' गणेशनगर, संगमनेर, जि. अहिल्यानगर, मो. ९८९०३५५७१९ / ८८८८३५५७१९**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, जि. अहिल्यानगर ता. संगमनेर पैकी मौजे गुंजाळवाडी येथील शेतजमीन

| स. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु = पैसे) |
|---|---|---|
| ८/१ | ०= १९ | ३ = ५५ |
| ८/२ | १= ०५ | ४= १५ |
| १०/२ | ०= ५८ ख. ०= ०.२ | २ = ३० |

| स. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु = पैसे) |
|---|---|---|
| १०/३ | १ = १४ ख. ०= ०.५ | ४ = ७० |
| १०/८ | ०= ७३ | ३ = १५ |

यांसी चतु:सिमा गांवचे रेकॉर्डप्रमाणे सदर मिळकत मुळची विनायक बेलापूरकर यांची होती. त्यांचे मृत्युनंतर ती मिळकत त्यांची मुले प्रभाकर, केशव उर्फ भास्कर, माधव, विश्वनाथ ही मुले व उषा शरदचंद्र देशमुख मुलगी यांचे नांवावर वारसाहक्काने आली. त्यात प्रत्येकाचा १/५ हिस्सा. सदर मिळकतीतील माधव विनायक बेलापूरकर यांचे १/५ हिश्श्यातील १/४ हिस्सा विलास माधव उर्फ माधवराव बेलापूरकर यांचा आहे, तो अविभक्त हिस्सा विलास माधव उर्फ माधवराव बेलापूरकर यांनी आमचे अशिल बाळासाहेब रेवजी गुंजाळ, दिपक श्रीनिवास जाजु, प्रदिप जयराम मिलाणी व प्रविण तान्हाजी वर्पे व संतोष मधुकर कोळपकर यांना खरेदी देण्याचे ठरवून ता. ०९/०६/२०२५ रोजी दस्त नं. २९४५/२०२५ नोंदवून इसार पावती करून दिली आहे. वरील मिळकतीचे वाटप झाल्यानंतर व मिळकतीला विलास माधव उर्फ माधवराव बेलापूरकर यांचे नावची वाटपाची नोंद झाल्यानंतर १ महिन्याचे आंत खरेदीखत करून देणेचे ठरले आहे. परंतु वरील मिळकतीचे अद्यापपावेतो वाटप झालेले नाही, म्हणून सदर मिळकतीचे खरेदीखत नोंदविणेचे राहिले आहे. यात विलास माधव उर्फ माधवराव बेलापूरकर यांनी मिळकतीचा सामाईक ताबा आमचे अशिलांस दिलेला आहे. खरेदीकामी पुर्तता केलेनंतर उर्वरीत रक्कम देऊन सदर मिळकतीचे खरेदीखत करून घेणेस आमचे अशिल तयार होते व आहेत. तरी वरील मिळकतीचे संबंधाने विलास माधव उर्फ माधवराव बेलापूरकर यांनी त्यांच्या अविभक्त हिस्सा आमचे अशिलास खरेदी देणेचे ठरवून दस्त नंबर २९४५/२०२५ अन्वये साठेखत लिहून दिले असल्याने सदर मिळकतीचे संबंधाने त्यांचेशी कोणीही व्यवहार करू नये, याउपर कोणी वरील मिळकतीचा व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. ही नोटीस ता. ०९/०५/२०२६.

**ॲड. सुनिल गणपतराव गेठे**

**'लक्ष्मी' गणेशनगर, संगमनेर, जि. अहिल्यानगर, मो. ९८९०३५५७१९ / ८८८८३५५७१९**


## पाहिजेत

**पसायदान** चिल्ड्रन क्लिनिक अ‍ॅण्ड नर्सिंग होम

ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर

डॉक्टर – BAMS / BHMS (सकाळ–१, रात्री –१)

नर्स – ANM / GNM (सकाळी –१, दुपारी–१, रात्री –२)

लॅब टेक्निशिअन (सकाळी –१, रात्री –१)

९९६०६१०६२३


## Change Name

My name is **Sidhdesh Nandu Pavar.** However, on my 10th and 12th standard mark sheets, my name has been mistakenly printed as **Siddhesh Nandu Pawar.** In reality, both names refer to the same person.

Address: At-Post Wadgaon Landaga, Taluka Sangamner

## नावात बदल

मी, **'बाळू किसन थोरात'**, याद्वारे असे जाहीर करतो की, माझे जुने नाव बदलून आता **'बाळासाहेब किसनराव थोरात'** असे केले आहे.

या संदर्भातील नोंदणी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग २, नोंदणी क्रमांक M-१८१३०६०३, दिनांक ७-१३ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रसिद्ध झाले. भविष्यात मला **'बाळासाहेब किसनराव थोरात'** याच नावाने ओळखण्यात यावे.

- पत्ता -

संगमनेर, जि. अहिल्यानगर


## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

• आवश्यकता आहे •

**क्रशर सुपरवायझर पाहिजे** (Crusher Supervisor)

- क्रशर प्लांटचे कामकाज पाहणे व सर्व ऑपरेटरवर देखरेख ठेवणे.
- मशीन चालू ठेवणे, प्रॉडक्शन व गुणवत्ता (Quality) याची जबाबदारी.
- मेंटेनन्स, साहित्य साठा व दैनिक नोंदी (Records) पाहणे.
- सुपरविजनचा अनुभव आवश्यक.

संपर्क (Stone Crusher) 8208878391 | संपर्क (Office) 9822684402

NKG Engineers & Govt Contractor

Crusher Kauthe Kamleshwar

## गाळे भाडेतत्वावर देणे आहे

शोरुम, ऑफिस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे

ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट

फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट

पत्ता – नाशिक–पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर

संपर्क - 7755965616, 9422737484

## पाहिजेत

सरस्वती अ‍ॅग्रो इंडस्ट्रीज करीता अर्जंट भरती चालू आहे

- टेलीकॉलिंग — 10 जागा — फ्रेशर १० ते १२ हजार पगार व अनुभवास १३ ते १५ हजार (कुठलीही शाखेची पदवी उत्तीर्ण व महिलांना प्राधान्य)
- प्रोडक्शन लाइन — 10 जागा — पगार- ८ ते १० हजार (महिलांना प्राधान्य)
- Dispatch सुपरवाइझर — 02 जागा — (कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण महिलांना प्राधान्य)
- ड्रायवर - पगार- १५ हजार — 05 जागा — (ड्रायविंग लायसेंस व् अनुभव आवश्यक)

अर्जासह प्रत्यक्ष भेटा कॉल व भेटीची वेळ 10.00 ते 5.00

**सरस्वती अ‍ॅग्रो इंडस्ट्रीज**

संगमनेर औद्योगिक वसाहत, प्लॉट नं. 127 /A , संगमनेर, जि. अ.नगर

9699363221

## नोकरीची संधी..!

संगमनेर येथील मालपाणी उद्योग समूहाकरिता

MALPANI

# पाहिजेत!

सिक्युरिटी गार्ड - पदे 4

गनमॅन - पद 1 (Retired Army Person with Valid Gun License)

- शैक्षणिक पात्रता -

किमान 10वी / 12वी उत्तीर्ण

- संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक अनुभव.
- संबंधित क्षेत्रातील **अनुभव असल्यास प्राधान्य** दिले जाईल.

**वयोमर्यादा** - कमाल 35 वर्षे

इच्छुक उमेदवारांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसांच्या आत ऑफिसच्या वेळेत प्रत्यक्ष संपर्क साधावा.

• संपर्क: **मालपाणी इस्टेट**, अकोले रोड, कासारादुमाला, संगमनेर– 422605, जि.अहिल्यानगर **मो.** 8484891804 **इमेल-** jobs@gmail.com

## त्वरित पाहिजेत

ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे

9421911671

## पाहिजेत

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६





दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९ ७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# नाशिकच्या भोंदू अशोकनंतर श्रीरामपूरचा भोंदू अशोक पकडला

श्रीरामपूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

नाशिकमधील लिंगपिसाट भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणानंतर, तसेच श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथील भोंदूबाबा गणेश शिंदे याच्या अटकेनंतर, टाकळीभान येथील भोंदूबाबा अशोक आढाव याला श्रीरामपूर तालुका पोलिसांनी अटक केली आहे. एका पीडित तक्रारदार महिलेकडे शरीरसुखाची मागणी करून, महिलेची १५ ते १६ लाख रुपयांची फसवणूक केली असल्याचे तक्रारदार महिलेने तक्रारीत सांगितले आहे.

टाकळीभान येथील दावल मलिक बाबा या ठिकाणी भोंदूबाबा अशोक आढाव संबंधित महिलेला पोटदुखीचा त्रास होत असल्यामुळे तिच्याकडे वारंवार पैशाची मागणी करून, महिलेची आर्थिक फसवणूक करून महिलेकडे शरीरसुखाची मागणी देखील केल्याचा आरोप आहे. श्रीरामपूर तालुका पोलिसांनी भोंदूबाबा अशोक मधुकर आढावला अटक केली आहे. सध्या हा भोंदू अशोक आढाव श्रीरामपूर शहरातील संगमनेर रोड परिसरात राहत होता, अशी माहिती समजते.

# इस्रायलमध्ये गृहआधारित काळजीवाहक पदांसाठी युवक-युवतींसाठी मोठी रोजगारसंधी



अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत इस्रायलमध्ये गृहआधारित काळजीवाहक पदांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील पात्र युवक-युवतींसाठी परदेशात रोजगाराची उत्तम संधी निर्माण झाली असून, इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त योगेश उगले यांनी केले आहे.

भारत आणि इस्त्रायल यांच्यात झालेल्या करारानुसार भारतीय व्यावसायिक काळजीवाहकांना मोठी मागणी निर्माण झाली असून, इस्त्रायलमध्ये सुमारे २ हजार ५०० रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. इस्त्रायलमधील युद्धग्रस्त नसलेल्या भागात गृहआधारित काळजीवाहक म्हणून नोकरीसाठी २५ ते ४५ वर्षे वयोगटातील उमेदवार पात्र ठरणार आहेत.

उमेदवारांना इंग्रजी भाषेचे ज्ञान तसेच सामान्य ज्ञान असणे आवश्यक आहे. संबंधित सेवेसाठी उमेदवारांनी भारतीय नियामक प्राधिकरणाने मान्यताप्राप्त किमान ९९० तासांचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. कार्यस्थळी प्रशिक्षणासह प्रमाणपत्र असणे आवश्यक असून, नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स सहाय्यक किंवा प्रसूती परिचर्या प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांनाही संधी उपलब्ध होणार आहे.

तसेच जीडीए, एएनएम, जीएनएम, बीएससी नर्सिंग, पोस्ट बीएससी नर्सिंग आदी शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवारही अर्जासाठी पात्र राहतील. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातून निवड प्रक्रिया, आरोग्य तपासणी, व्हिसा व पासपोर्ट प्रक्रियेसाठी संपूर्ण मार्गदर्शन आणि मदत कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडून करण्यात येणार आहे.

निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय विमा तसेच राहण्याची आणि जेवणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, भारतीय चलनानुसार दरमहा सुमारे दोन लाख रुपये वेतन मिळणार आहे.

इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी महाराष्ट्र इंटरनॅशनल अधिकृत संकेतस्थळ येथे ऑनलाईन नोंदणी करून या रोजगारसंधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष अथवा ०२४१-२९९५७३५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज योजनेत धांदरफळ बु. आघाडीवर



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक ग्रामपंचायतीची शुक्रवार, ८ मे २०२६ रोजी तपासणी पूर्ण झाली. हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकारी व तपासणी पथकाने या गावाला भेट देऊन राबवलेल्या विविध लोककल्याणकारी योजना आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची सविस्तर पाहणी केली. गावातील पारदर्शक कारभार आणि लोकसहभागातून झालेल्या कामांबाबत पथकाने समाधान व्यक्त केले आहे.

तपासणी पथकात सेनगावचे गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, बालविकास प्रकल्प अधिकारी विवेक वाकोडे, विस्तार अधिकारी माधव कोकाटे, गट व्यवस्थापक विनोद बनसोडे व पर्यवेक्षक टीमचा समावेश होता. पथकाचे आगमन होताच प्रथम ग्रामदैवत श्री रामेश्वर देवस्थान येथे अभिषेक करण्यात आला. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात गावचे मार्गदर्शक बाळासाहेब देशमाने, सरपंच उज्वला नवनाथ देशमाने, उपसरपंच भारत कोल्हे आणि ग्रामपंचायत अधिकारी सुरेश मंडलिक यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

समितीने अभियानाच्या आठ तत्त्वांच्या आधारे गावातील विकासकामांची सूक्ष्म पाहणी केली. यामध्ये पर्यावरण आणि हरितक्रांतीमध्ये कारेश्वर येथे ५१,००० वृक्षांचे भव्य वृक्षारोपण, मियावाकी जंगल, ऑक्सिजन पार्क आणि औषधी वनस्पती उद्यानामुळे गावाने पर्यावरणाचा समतोल राखला आहे. स्वच्छता आणि आरोग्यामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प, गांडूळखत निर्मिती आणि सार्वजनिक थुंकीदानी यांसारख्या उपक्रमांमुळे गाव 'स्वच्छ व हरित' दिसत आहे. जल व्यवस्थापनामध्ये 'जलजीवन मिशन' अंतर्गत १००% नळ जोडणी, नियमित पाणी गुणवत्ता तपासणी आणि वनराई बंधाऱ्यांमुळे पाणी टंचाईवर मात केली आहे. डिजिटल आणि ई-गव्हर्नन्समध्ये जन्म-मृत्यू दाखले, घरपट्टी व पाणीपट्टी ऑनलाईन भरण्याची सुविधा ग्रामस्थांसाठी उपलब्ध असून, प्रशासन पूर्णपणे डिजिटल झाले आहे. नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी 'नाना-नानी पार्क', मत्स्यपालन केंद्र आणि अभ्यास भोंगा यांसारख्या २० पेक्षा जास्त हटके उपक्रमांची पथकाने विशेष दखल घेतली.

तपासणीअंती आपले मत व्यक्त करताना गटविकास अधिकारी सुरेश कांबळे म्हणाले की, धांदरफळ बुद्रुक ग्रामपंचायतीने अभियानाच्या निकषांवर अत्यंत प्रभावी काम केले आहे. लोकसहभाग आणि पारदर्शक कारभार हे या समृद्धीचे मूळ आहे. या कामाचा अहवाल आम्ही वरिष्ठ कार्यालयास सादर करणार असून, हे गाव तालुका व जिल्हास्तरावर नक्कीच आदर्श ठरेल. यावेळी सहायक गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर, विस्तार अधिकारी राजेंद्र कासार, काशिनाथ सरोदे, जि. प. शाळा मुख्याध्यापिका स्वाती दिघे, आरोग्य उपकेंद्राच्या सोनाली पवार, जयदेव डेरे, जयराम दिवटे, पोपट वाकचौरे, संगीताताई गायकवाड, भारतीताई भोपळे, रामेश्वर देवस्थान अध्यक्ष सुनील देशमुख, नवनाथ देशमाने, वासुदेव काका वाकचौरे, दत्ता कासार, डॉ. संजय थोरात, आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि बचत गटाच्या महिलांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरात प्रकरणात रूपाली चाकणकरांच्या चौकशीला वेग

नाशिक (प्रतिनिधी)-

राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता राजकीय धागेदोरे अधिक गडद होताना दिसत आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली चाकणकर यांची तब्बल सहा तास कसून चौकशी केली. एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी स्वतः जवळपास दोन तास चाकणकर यांना विविध मुद्द्यांवर प्रश्न विचारले.



अशोक खरात प्रकरणात रूपाली चाकणकर यांचे नाव चर्चेत आल्यानंतर त्यांना एसआयटीकडून नोटीस बजावली जाणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. सुरुवातीला आपल्याला कोणतीही नोटीस प्राप्त झाली नसल्याचे सांगणाऱ्या चाकणकर अखेर आज नाशिक येथे एसआयटीसमोर हजर झाल्या. सकाळपासून सुरू झालेली चौकशी सायंकाळपर्यंत सुरू होती. यापूर्वी त्यांच्या बहिणीचीही एका पतसंस्थेतील आर्थिक व्यवहारांप्रकरणी चौकशी करण्यात आली होती. त्यामुळे आजची चौकशी विशेष महत्त्वाची मानली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एसआयटीने चाकणकर यांच्यासमोर प्रश्नांची सरबत्तीच केली. अशोक खरातसोबतचे संबंध नेमके कधीपासून होते, त्याच्यासोबत करण्यात आलेले पूजा-विधी कोणते होते, त्या मागे आर्थिक व्यवहार होते का, 'शिवनिका' संस्थेच्या बैठकींमध्ये नेमके कोणते कामकाज चालत होते, खरातच्या गैरप्रकारांची माहिती आधीपासून होती का, तसेच त्याच्या मंदिरात येणारे इतर राजकीय नेते कोणाच्या सांगण्यावरून येत होते का, यासह खरातसोबतचे फोटो आणि व्हिडिओ नेमके कोणत्या कार्यक्रमातील होते, असे अनेक प्रश्न त्यांना विचारण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

चौकशी पूर्ण झाल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना रूपाली चाकणकर म्हणाल्या, तपास यंत्रणेला आवश्यक असलेल्या सर्व बाबींमध्ये मी पूर्ण सहकार्य केले आहे. एसआयटीच्या प्रत्येक प्रश्नाला मी समर्पक उत्तरे दिली असून माझी बाजू सविस्तरपणे मांडली आहे. या चौकशीचा अहवाल लवकरच समोर येईल. अधिक भाष्य टाळत त्या तत्काळ पुण्याच्या दिशेने रवाना झाल्या.

दरम्यान, याआधी एसआयटीने रूपाली चाकणकर यांच्या बहिणीचीही चौकशी केली होती. एका पतसंस्थेतील संशयास्पद आर्थिक व्यवहारांच्या अनुषंगाने ही चौकशी पार पडली होती. अशोक खरातच्या पोलीस कोठडीत सातत्याने वाढ होत असताना आता उच्चपदस्थ राजकीय व्यक्तींची चौकशी सुरू झाल्याने या प्रकरणाने नवे वळण घेतले आहे.

मुख्य आरोपी अशोक खरातसोबतचे काही फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी रूपाली चाकणकर यांच्यावर गंभीर आरोप केले होते. चाकणकर या खरातला आपला 'गुरू' मानत असल्याचा दावा करत विरोधकांनी काही प्रकरणांमध्ये त्यांनी राजकीय हस्तक्षेप केल्याचा संशय व्यक्त केला होता.

# संगमनेरमध्ये विराट हिंदू संमेलनाचे आयोजन

संगमनेर (प्रतिनिधी) : अखंड हिंदू समाज आणि हिंदू एकता समिती, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात विविध राष्ट्रीय, सामाजिक आणि हिंदुत्वाशी निगडित विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी चांदवड येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे नाशिक विभाग सह बौद्धिक प्रमुख बाबासाहेब गांगुर्डे (गुरुजी) तसेच पुणे येथील प्रसिद्ध सोशल मीडिया इंफ्लूयन्सर व लँड जिहाद, कोर्पोरेट जिहाद, लव्ह जिहाद अशा अनेक विषयांवर आपल्या व्हिडीओच्या माध्यमातून हिंदू जागरणाचे काम करणारे सी.ए. सर्वेश मेहेंदळे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. हिंदू समाजाचे संघटन, सामाजिक एकात्मता आणि राष्ट्रभक्तीचा संदेश देण्याच्या व हिंदू म्हणून आपली काय जबाबदारी आहे या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

पथ का अंतिम लक्ष्य नहीं है, सिंहासन चढ़ते जाना। सब समाज को लिए साथ में, आगे है बढ़ते जाना। तसेच हिंदू असतील भाग्य विधाते आगामी शतकाचे या घोषवाक्यांद्वारे समाज एकतेचा संदेश देण्यात आला आहे.

या संमेलनास माता-भगिनींनी व सर्व हिंदू समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# तळेगाव दिघे येथे जुगार अड्ड्यावर छापा

## ५ लाख ८५ हजाराचा मुद्देमाल जप्त

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील तळेगाव दिघे शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी (दि.९) धाडसी कारवाई करत आठ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल व मोटारसायकली असा एकूण ५ लाख ८५ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त. करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर तालुका पोलीस ठाणे हद्दीत शनिवारी पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तळेगाव दिघे ते वडगाव पान रस्त्यावरील समर्थ पेट्रोल पंपासमोर लिंबाच्या झाडाखाली काही इसम विनापरवाना 'तिरट' नावाचा हारजितीचा जुगार खेळत आहेत. माहिती मिळताच पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. या कारवाईत शशिकांत काशिनाथ जगताप (रा. तळेगाव दिघे), पंढरीनाथ काशिनाथ भेंडाळे

(रा. कहांडळवाडी, ता. सिन्नर), विलास रघुनाथ दिघे काशिनाथ जगन्नाथ जगताप, सचिन बबन दिघे, अण्णासाहेब बाळू जगताप, सुनील नवनाथ दिघे (सर्व रा. तळेगाव दिघे, ता. संगमनेर) तसेच सुरेश भाऊसाहेब कांडेकर रा. डोंगेवाडी, ता. कोपरगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून ७ हजार ५१० रुपयांची रोख रक्कम, १ लाख ५ हजार रुपये किमतीचे आठ मोबाइल फोन तसेच ४ लाख ७३ हजार ३२० रुपये किमतीच्या सात मोटारसायकली असा एकूण ५ लाख ८५ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गु.र.नं. २५२/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. या कारवाईमुळे अवैध धंदे चालकांत एकच खळबळ उडाली आहे.

# सावरगावतळ चा रस्ता बनला मृत्यु चा सापळा



संगमनेर (प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी ते सावरगाव तळ या रस्त्याचे जवळपास दोन वर्षांपासून रुंदीकरण व डांबरीकरण काम सुरू आहे.पालकमंत्री, विद्यमान आमदार, सरपंच, कार्यकर्ते यांनी ३ ते ४ वेळा उद्घाटन देखील केले.पण अजूनही काम अर्धवट आहे.अत्यंत दुर्दशा रस्त्याची झाली असून अपघाताचे प्रमाण वाढले आहे यामुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा बनल्याने नागरिकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली आहे.

तालुक्यामध्ये मागील दीड वर्षापासून टक्केवारी वाढली आहे त्यामुळे अनेक विकास कामे रखडली आहेत. अनेक गावांमधून रस्त्यांची कामे तशीच पडून आहे. फक्त सोशल मीडिया आणि फ्लेक्स बाजी केली जात आहे. याबाबत सावरगाव तळ येथील युवक कार्यकर्त्यांनी ग्रामसेवक व पदाधिकाऱ्यांना निवेदनही दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की ठेकेदार २ दिवस काम करतो तर महिनाभर परत कामाकडे डोकावत पण नाही. प्रशासनाचे तर अजीबातही लक्ष कामा कडे नाही.अर्धवट कामामुळे अपघात होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अर्धवट कामामुळे चंदनापुरी ते सावरगाव तळ परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या धुळीमुळे कर्करोग होईल की काय या भीतीने नागरिक भयभीत झाले आहे.अधिकारी, व लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष असल्याचा फायदा ठेकेदार घेत असल्याची चर्चा नागरिक करत आहे.

संगमनेर तालुक्यातील विविध कॉन्ट्रॅक्टर हे टक्केवारीमुळे त्रस्त झाली असून त्यांचे पेमेंट येत नसल्याने काम बंद असल्याचे ठेकेदार बोलतो. पण आजूबाच्या तालुक्यातील गावात रस्त्याचे काम काही प्रमाणात आहे. तब्बल दोन वर्षांपासून सुरू असलेले काम कधी पूर्ण होईल या कडे सर्वांचे लक्ष लागून आहे. पालकमंत्री व आमदार हे उद्घाटन करून गेले खरे पण पाठीमागे नेमके काय झाले याची साधी चौकशी ही त्यांनी केली नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहे.

पुढील आठ दिवसांत काम पूर्ण झाले नाही तर तीव्र आंदोलन छेडण्यातील असा इशारा सावरगाव तळ येथील युवक कार्यकर्ते व नागरिकांनी दिला आहे. संगमनेर तालुका हा विकासातून पुढे आलेला आहे मात्र मागील दीड वर्षापासून तालुक्यामध्ये उद्घाटनांचा धडाका होतो. कोणतेही काम होत नाही. टक्केवारी मागितली जाते. यामुळे अनेक कामे रखडली जात असून फक्त उद्घाटन करतात परत फिरकून पाहिले जात नाही त्यामुळे संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये विद्यमान सत्ताधाऱ्यांनी विरुद्ध मोठा असंतोष निर्माण झाला आहे.

# एस.एस.सी. परीक्षेत अँग्लो उर्दू हायस्कूलची उज्ज्वल कामगिरी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्ट संचलित अँग्लो उर्दू हायस्कूल, संगमनेर, एस.एस.सी. बोर्ड परीक्षा २०२६ चा ९८.२३ असा शानदार निकाल लागला आहे. इनामदार स्वालेहा समीर यांनी ८७.२० टक्के घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला, तर कु. शेख मर्जीया रऊफ यांनी ८७.०० टक्के घेऊन द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तर कु. शेख स्वालेहा साजिद यांनी ८६.४० टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकाविला.

संस्थेचे विश्वस्त व अँग्लो उर्दू हायस्कूल कमिटीचे चेअरमन शेख गनी हाजीसेठ, संस्थेचे चीफ ट्रस्टी चौधरी अब्दुल्लाह हाजी हसन, सचिव हाजी पठाण शौकतखान मोहंमदखान, संस्थेचे विश्वस्त शेख नजीर ताज मोहम्मद, पठाण अय्युब खान हुसैन खान, श्री. हाजी शेख एजाज शमशुद्दीन, हाजी शेख जमील अहमद फतेह मोहम्मद, तसेच शाळा समिती सदस्य हाजी इनामदार शमसुद्दीन जैनुद्दीन सर, हाजी शेख दस्तगीर बुढन भाई व शेख इरफान हाजी फजलोद्दीन सर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व या शानदार यशाचे श्रेय सर्व शिक्षकांना दिले.

तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. शेख मुनव्वर खलीलूरेहमान सर व पर्यवेक्षक रहमानी उबेदूरहमान कालीमुररहमान यांनी प्राप्त यशाचे श्रेय सर्व शिक्षक वर्गाला दिले व त्यांचे कौतुक केले. विद्यालयाच्या यशाचे पालक वर्गाकडून कौतुक होत आहे.

# निळवंडे विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

भाऊसाहेब संतुजी थोरात विद्यालय, निळवंडे येथील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला. विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून परिसरातून विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक होत आहे, अशी माहिती प्राचार्य श्रीकांत माघाडे यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक, संस्था व निळवंडे गावामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयात प्रथम क्रमांक साईराज शशिकांत पवार याने मिळवला असून, त्याला ७६.६० गुण मिळाले आहेत. अमित प्रभाकर पवार व प्रणाली नितेश गायकवाड यांनी ७६.२० गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांक आदिती गोरक्षनाथ केरे हिने ७५.८० गुण मिळवून प्राप्त केला. अभिमन्यू संदीप गाढे याने ७४.४९ गुण घेऊन चौथा क्रमांक मिळवला. आदित्य बाळासाहेब पवार याने ६९.८० गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळवला.

याबद्दल सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेचे चेअरमन मा. डॉक्टर सुधीरजी तांबे, संचालक बाबा खरात, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन सुभाष माधवराव पवार, सेक्रेटरी माधवराव शिवराम पवार, संचालक नाना बाळकृष्ण पवार, रायभान नारायण पवार, प्रकाश पंढरीनाथ पवार, आप्पासाहेब दामू पवार, उत्तम गणपत पवार, बाळासाहेब जगन्नाथ आहेर, मच्छिंद्र गवराम कांदळकर, प्रभाकरराव पवार अंकल, विकास पवार, सहकारी राजीव साळवे, आशा जगताप, सत्यम पवार यांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना अक्षय ढोले सर, माधव बढे सर, श्रीराम भांगरे सर, सुरेखा कडाळे मॅडम यांनी वर्षभर जादा तास घेऊन मार्गदर्शन केले. त्याबद्दल त्यांचेही परिसरातून कौतुक होत आहे.

आपल्या व्यावसयाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यावसयाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# शेतकऱ्यांना पीक विमा द्या; आ. खताळ

## हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी



मी सातत्याने विधानसभेत आणि शासन स्तरावर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवत आलो आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांकडेही याबाबत पत्राद्वारे पाठपुरावा केला आहे. मात्र काही अधिकारी दिरंगाई करत असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचा विमा तत्काळ मिळाला पाहिजे. अन्यथा शेतकऱ्यांच्या न्यायासाठी तीव्र आंदोलन उभारावे लागेल. दुर्दैवाने काहीजण या विषयातही राजकारण करून स्वतःची पोळी भाजण्याचा प्रयत्न करत आहेत; पण मी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत लढत राहणार आहे.

**आमदार अमोल खताळ**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात खरीप हंगाम २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या नुकसानीचे महसूल व कृषी विभागामार्फत पंचनामे करून शासनाकडे प्रस्तावही सादर करण्यात आले. मात्र इतकी प्रक्रिया पूर्ण होऊनही तालुक्यातील अनेक पात्र शेतकऱ्यांना अद्याप पीकविमा नुकसान भरपाई मिळालेली नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. याबाबत आमदार अमोल खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पूर्वीच पत्राद्वारे पाठपुरावा केला असल्याची माहिती त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली आहे.

आमदार खताळ यांनी म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यातील काही तालुक्यांना नुकसान भरपाई व पीकविमा अनुदान मंजूर करण्यात आले असून अनेक तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये विमा रक्कम जमा झाली आहे. मात्र संगमनेर तालुक्यातील शेतकरी अद्यापही विमा रकमेपासून वंचित आहेत. संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची हलगर्जी, दिरंगाई आणि उदासीनता यामुळेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. यामुळे आधीच नैसर्गिक संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे.

शासनाने या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी तसेच संगमनेर तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने पीकविमा रक्कम जमा करण्यासाठी संबंधित विभागांना स्पष्ट निर्देश द्यावेत अशी मागणी आमदार खताळ यांनी केली आहे. दरम्यान पीकविमा प्रश्नावर काहीजण राजकारण करत असल्याचा आरोप करत त्यांनी विरोधकांवरही अप्रत्यक्ष निशाणा साधला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आपण सातत्याने आवाज उठवत आलो असून शेतकऱ्यांच्या न्यायासाठी लढा सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# रक्षक दलामुळे एटीएम फोडीचा प्रयत्न फसला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील नगरपालिका रक्षक दलाच्या सतर्कतेमुळे शनिवारी (दि. ९) मध्यरात्री शहरातील माळीवाडा भागात एटीएम फोडीचा प्रयत्न फसला.

याबाबत अधिक माहिती अशी, शनिवारी (दि. ९) रात्री १ वाजेच्या सुमारास रक्षक दलाचे चारचाकी वाहन शहरात नियमित गस्त घालत होते. त्यावेळी माळीवाडा नगरपालिका गेटजवळील सेंट्रल बँक ऑफ इंडिया एटीएममध्ये एक संशयित व्यक्ती असल्याचा कॉल रक्षक दलाला प्राप्त झाला. यातच एटीएमची लाईट बंद असल्याची शंका वर्तवण्यात आली. त्यामुळे प्रकार संशयास्पद वाटताच रक्षक दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

रक्षक दल घटनास्थळी पोहोचले असता, संबंधित व्यक्तीने त्यापुर्वीच धूम ठोकली. मात्र एटीएमची पाहणी केली असता, मशीनच्या डिस्प्लेची तोडफोड करुन एटीएमचे काही भाग तुटून खाली पडलेला होतो. त्यामुळे हा प्रकार गंभीर असल्याचे लक्षात येताच रक्षक दलाने संपूर्ण परिसराची पाहणी सुरू केली.

याचवेळी एटीएमच्या काही अंतरावर एक युवक बसलेला दिसून आला. संशयाच्या आधारे त्याची चौकशी करण्यात आली. मात्र, मी आत्ताच येथे आलो असून मला काहीच माहिती नाही, असे त्याने सांगितले. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून रक्षक दलाने त्याला तेथेच थांबवत तातडीने संगमनेर पोलिसांशी संपर्क साधला. सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करत सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या संगमनेर शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

माहिती देताच सदर बँकेच्या कर्मचारी शांता धाडगे यांनी घटनास्थळी उपस्थित राहत एटीएमची पाहणी केली. याबाबत पुढील तपासाची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून रक्षक दल आणि पोलीस कर्मचारी बराच वेळ घटनास्थळी होते. याबाबत पुढील तपास पोलीस करत आहे. दरम्यान नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली अवघ्या काही दिवसांपूर्वी स्थापन झालेले संगमनेर नगरपरिषदेचे रक्षक दल शहरात नियमित गस्त घालत आहे. विविध घटनांमध्ये तत्परतेने कारवाई करत असून नागरिकांमध्ये या दलाबद्दल विश्वास वाढत असून शहरात सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

# श्रावणी भोर दहावीत पहिली



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील आंबड येथील अंबिका माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रावणी बाळासाहेब भोर हिने दहावी परीक्षेत ८६ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. अतिशय मेहनतीने तीने हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे शाळा व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

श्रावणीच्या या यशाबद्दल तिच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, शिक्षक, पालक व नातेवाईकांनी तिचे कौतुक केले आहे. तीच्या या यशात शिक्षक श्री. लोटे सर, भोर मॅडम, श्री. जाधव सर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. तिला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने शुभेच्छा...

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# संगमनेरात दोन बहिणींची छेडछाड

## तरुणावर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

दोन सख्या बहिणींचा वारंवार पाठलाग करून त्यांना मैत्रीसाठी, मोबाईल नंबरसाठी त्रास देणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात संबंधित तरुणाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान शहरात टारगट तरुणांकडून मुली महिलांच्या छेडछाडीमुळे महिला मुली त्रस्त झाल्या असून पोलिसांचे दुर्लक्ष झाल्याने शहरात गुन्हेगारी वाढली आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार, फिर्यादी महिला सध्या आपल्या माहेरी वास्तव्यास आहे. दि. ४ मे रोजी रात्रीच्या सुमारास फिर्यादी आणि त्यांची १४ वर्षीय लहान बहीण घराबाहेर फिरत असताना, दुचाकीवर आलेल्या दोन तरुणांपैकी एकाने त्यांचा मोबाईल नंबर मागण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर सलग काही दिवस संबंधित तरुण या दोन्ही बहिणींचा पाठलाग करत होता. दि. ८ मे रोजी रात्री पुन्हा या तरुणाने आईस्क्रीमच्या दुकानापाशी या दोघींना अडवून मैत्री करण्याची मागणी करून मोबाईल नंबरसाठी तगादा लावला. यावेळी दोन्ही बहिणींनी त्याची विचारणा केली असता, त्याने आपले नाव सौरभ सुभाष पानसरे (रा. जाखुरी) असल्याचे सांगितले. सदर घटना एवढ्यावरच न थांबता दि. ९ मे रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास या तरुणाने फिर्यादीच्या चुलत बहिणीमार्फत त्यांना घराबाहेर बोलावून घेतले.

दरम्यान, वारंवार होणाऱ्या या त्रासामुळे फिर्यादीच्या पालकांनी आणि परिसरातील नागरिकांनी या तरुणाला रंगेहाथ पकडले. नागरिकांनी पकडल्यानंतरही त्याने 'तुमच्याकडे बघून घेतो', अशी धमकी दिली, मात्र उपस्थित नागरिकांनी त्याला तत्काळ पोलिसांच्या ताब्यात दिले.

संगमनेर शहर पोलिसांनी या प्रकरणी सौरभ सुभाष पानसरे याच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक इमरान खान करत आहेत.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर




०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी
अंगावरून पांढरे जाणे
गर्भ न रहाणे
वारंवार गर्भपात होणे
गर्भाशयात गाठी
गर्भाशयाचा कर्करोग
स्तनांची वाढ न होणे
स्तनातून दूध न येणे
स्तनात गाठी
स्तनाचा कर्करोग
योनी मार्गाची दुर्गंधी
गुप्त अंगाला खाज
विविध त्वचा विकार
गुप्तरोग, गर्मी
लघवीला जळजळ
संभोगात रस न येणे
संभोगा विषयीची भीती
हस्तमैथूनाची सवय
लैंगिक विकृती
मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13




कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25